# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*कुलसचिव कार्यालय(आस्थापना विभाग)*

**एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२–२१६५९२**


**क्र./आस्था/1704/२०१६** **दि. : 16/०७/२०१६**

## परिपत्रक

**विषय**:— सन्माननीय व्यक्ती आणि अधिकारी यांचे स्वागत रोप किंवा पुस्तक देवून स्वागत करणेबाबत.

संदर्भ:—१.मा. वित्त आणि नियोजन ,वन मंत्री महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुबंई यांचे पत्र दि. २८/६/२०१६.

२. महसुल व वनविभाग, शासन परिपत्रक क्रं.एफएसटी—०७/१५/प्र.क्रं./३४१/फ—४, दिनांक १७ जुलै २०१५.

३.जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचे पत्र क्रं. कार्या—२/प्रस्तुतकार/कावी/६८८/२०१६, दि.०१ जुलै २०१६.

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन परिपत्रकानुसार शासकीय समारंभ, बैठकांच्या वेळी आणि शासकीय विश्रामगृहांमध्ये येणा—या मान्यवर व्यक्ती यांचे स्वागत पुष्पगुच्छ देवुन करण्याऐवजी उत्तम प्रतीचे रोप किंवा पुस्तक देवून स्वागत करावे. तसेच वन, वन्यप्राणी, जैवविविधता यांचे संरक्षण व संवर्धन आणि वनक्षेत्र वाढविण्यासाठी उपाययोजना यासंदर्भातील पुस्तक भेट देवून देखील त्यांचे स्वागत करता येईल. संलग्नीत शासन परिपत्रकातील सुचनांची अमलबजावणी करण्यात यावी. जेणे करुन पर्यावरण, निसर्ग या क्षेत्राचे रक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होईल. याबाबीचे कृपया काटेकोरपणे पालन करावे, ही विनंती.

**प्रति**,
मा. प्राचार्य
विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**(डॉ. श्रीराम रोकडे)**
कुलसचिव(प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी:—

१. मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांना समादाराने माहितीकरिता अग्रेषीत
२. मा. निवासी ऊपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांना समादाराने माहितीकरीता अग्रेषीत.
३. मा. सहसचिव(वने), महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, मंत्रालय मुबंई यांना माहितीकरीता अग्रेषीत.
४. विद्यापीठातील सर्व संबधित विभागांचे विभागप्रमुख यांना माहीतीस व कार्यवाहीकरिता अग्रेषीत

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ........
जावक क्र. ३३४७ दि. ८/७/१६

(७८)

# जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

(प्रस्तुतकार शाखा)
दुरध्वनी क्रमांक ०७१३२-२२२००५ फॅक्स क्रमाक ०७१३२-२२२०२२
E-mail Id- rdcgadchiroli@gmail.com

क्रं. कार्या-२/प्रस्तुतकार/कावी/६८/२०१६
दिनांक -:७ जुलै, २०१६

प्रति,

३८ कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(सर्व कार्यालयीन प्रमुख गडचिरोली जिल्हा)

[stamp] आवक/जावक विभाग
आवक ३५४५ दि ०७.०७.१६
जावक ३५४५ दि ०७.०७.१६

विषय :- सन्माननीय व्यक्ती आणि अधिकारी यांचे स्वागत रोप किंवा पुस्तक देऊन करणेबाबत.

[stamp] गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. १७८७ दि. ८-७-१६
जावक क्र. ........ दि.........

संदर्भ :- १. मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक २८.६.२०१६

२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रं. एफएसटी-०७/१५ / प्र.क्रं.३४१/फ-४ दिनांक १७ जुलै,

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र व शासन परिपत्रकाचे अनुषंगाने, कळविणेत येते की, शासकीय समारंभ, बैठकांच्या वेळी आणि शासकीय विश्रामगृहांमध्ये येणाऱ्या मान्यवर व्यक्ती यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी उत्तम प्रतीचे रोप देऊन स्वागत करावे. तसेच वन, वन्यप्राणी, जैवविविधतता यांचे संरक्षण व संवर्धन आणि वनक्षेत्र वाढविण्यासाठी उपाययोजना यासंदर्भातील पुस्तक भेट देवून देखील त्यांचे स्वागत करता येईल.

करीता आपल्या अधिपत्याखालील अधिकारी, कर्मचारी यांना संदर्भिय शासन परिपत्रकातील सूचना देऊन व्यापक आणि विस्तृत जनजागृती करण्याबाबत कार्यवाही व अमल करावा, जेणे करुन पर्यावरण, निसर्ग या क्षेत्राचे रक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होईल.

सुलभ संदर्भाकरीता संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत संलग्न आहे.

नि. ऊ. जि.
जिल्हाधिकारी गडचिरोली करीता.

प्रतिलीपी :- मा. मंत्री, वित्त आणि नियोजन, वने, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना माहितीस सविनय सादर.

नि. ऊ. जि.
जिल्हाधिकारी गडचिरोली करीता.

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
वित्त आणि नियोजन, वने
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : २८/६/०१६

**विषय:-** सन्माननीय व्यक्ती आणि अधिकारी यांचे स्वागत रोप किंवा पुस्तक देऊन करणेबाबत.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने वन विभागाने दि. १७ जुलै, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये वन विभागातंर्गत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सविस्तर सूचना दिल्या आहेत. या शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

शासकीय समारंभ, बैठकांच्या वेळी आणि शासकीय विश्रामगृहांमध्ये येणाऱ्या मान्यवर व्यक्ती यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी रोप देऊन केल्यास सदर रोप अन्य ठिकाणी लावले जाईल. त्याचबरोबर वन आणि वन्यजीव यांच्याशी संबंधित पुस्तक भेट देऊन सन्माननीय व्यक्तींचे स्वागत केल्यास त्या पुस्तकातील माहिती आणि ज्ञानाचा प्रसार होऊ शकेल. त्यामुळे वन, वन्यजीव, जैवविविधता, पर्यावरण, निसर्ग या क्षेत्राचे रक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होईल.

रोप किंवा पुस्तक देऊन स्वागत करणे हा उपक्रम जरी छोटासा वाटला तरी, अशा लहानशा उपक्रमातून वृक्षाबद्दलचे प्रेम, आत्मीयता आणि जिव्हाळा वाढीस लागण्यास मदत होईल. त्याचबरोबर "थेंबे थेंबे तळे साचे" या उक्तीप्रमाणे प्रत्येकाच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील वृक्ष आवरण वाढण्यास मदत होऊ शकेल.

तरी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी, कर्मचारी यांना याबाबत माहिती देऊन व्यापक आणि विस्तृत जनजागृती करण्याबाबत कार्यवाही करावी. या उपक्रमाचा प्रसार व प्रचार केल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन.

RDC

शुभेच्छांसह!

आपला,

सर्व संबंधितांना
मा. मंत्री महोदयांच्या सूचना
communicate कराव्या व
सर्व सूचना collector office
मध्ये लागू कराव्या

(सुधीर मुनगंटीवार)

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सर्व आयुक्त, महानगरपालिका.
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, नगरपालिका/नगरपरिषदा.
६) सर्व प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख

कार्यालय जिल्हाधिकारी,
गडचिरोली
आवक तारीख 30/6/2016
शाखा ...... प्रशा ......
पर्यवेक्षक ............
कार्यविवरणक्रमांक 58 ............
/निउजी/अप्पर जि.अ./जिल्हाधिकारी

वन विभागातंर्गत कार्यालये आणि विश्रामगृहे येथे मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी किंवा समारंभाच्या वेळी त्यांचे स्वागत रोप किंवा पुस्तक देऊन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र. एफएसटी-०७/१५/प्र.क्र.३४१/फ-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- १७ जुलै, २०१५

प्रस्तावना :-

वन विभागामध्ये कामकाजाच्या निमित्ताने मान्यवर व्यक्ती व अधिकारी विविध कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी ठिकाणी भेटी देत असतात. वन विभागांतर्गत कार्यालये आणि विश्रामगृहाच्या आजूबाजूचा परिसर निसर्गरम्य व्हावा आणि त्या ठिकाणी पक्षी, कृमी आणि किटक यांचा अधिवास (Habition) निर्माण व्हावा म्हणून, फळफळावळ आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करून त्यांची जोपासणा केली जाते. तसेच सदरचा परिसर अधिक आकर्षक व्हावा म्हणून रंगीबेरंगी फुलझाडांची आणि शोभीवंत वृक्षांची देखील लागवड केली जाते. अशा झाडांच्या सोबतीने काही मौल्यवान वृक्षवेली वाढतात आणि त्यांच्या फुलातून हा भाग अधिक बहरला जातो. यातून नैसर्गिक अन्न साखळीचे जतन होऊन या क्षेत्रात जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होते.

त्याशिवाय विश्रामगृहाच्या आतील मोकळ्या जागेत आणि कार्यालयाच्या परिसरात काही दुर्मिळ आणि त्या भागाचे सौंदर्य खुलवेल अशी फुलझाडे (Exotic plants) लावली जातात. असे वृक्ष आणि फुलझाडे आजुबाजूचे वातावरण प्रफुल्लीत ठेवून निसर्ग सौंदर्यात अधिक भर घालतात.

क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देणारे अधिकारी आणि विश्रामगृहात येणाऱ्या मान्यवर व्यक्तींचे सर्वसाधारणे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले जाते. पुष्पगुच्छ तयार करण्यासाठी कोणत्या-ना-कोणत्या परिसरातील झाडांच्या फांद्या,पाने, फुले आणि वृक्षवेली तोडली जातात. त्यामुळे दुर्मिळ पक्षी आणि इतर लहान वन्यजीव यांचा अधिवास आणि अन्नसाखळी प्रभावित होते. तसेच त्या परिसरातील निसर्ग सौंदर्याची जपवणूक करण्यावर परिणाम होतो.

मान्यवर व्यक्तींचे अशा ठिकाणी स्वागत करतांना पुष्पगुच्छ देण्याऐवजी रोप देऊन स्वागत केल्यास सदर रोप अन्य ठिकाणी लावले जाईल आणि त्यातून वृक्षांचे प्रमाण वाढण्यास हातभार लागू शकेल. तसेच वन आणि वन्यजीव यांच्याशी संबधित पुस्तक भेट दिल्यास त्यामधील माहिती आणि ज्ञानाचा प्रसार आणि प्रचार होऊन, वन आणि वन्यजीव यांचे रक्षण आणि संवर्धन होण्याच्या दृष्टीने मदत होईल. त्याचप्रमाणे पुष्पगुच्छांसाठी होणारा खर्च वाचू शकेल.

परिपत्रक:-

प्रस्तावनेत नमूद विविध बाबींचा विचार करुन यापुढे विभागातंर्गत क्षेत्रिय कार्यालये, कामाची ठिकाणे आणि विश्रामगृहांना भेट देणाऱ्या मान्यवर व्यक्तींचे स्वागत करतांना पुष्पगुच्छ देण्याऐवजी, उत्तम प्रतीचे रोप देऊन स्वागत करावे. तसेच वन, वन्यप्राणी, जैवविविधतता यांचे संरक्षण व संवर्धन आणि वनक्षेत्र वाढविण्यासाठी उपाययोजना यासंदर्भातील पुस्तक भेट देवून देखील त्यांचे स्वागत करता येईल. विशेषत: सेवेमधील किंवा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी लिहिलेली पुस्तके किंवा अन्य माहिती पुस्तिका भेट देण्यास प्राधान्य देण्यात यावे.

त्याचप्रमाणे कार्यालये, विश्रामगृहे किंवा अन्य ठिकाणी विभागांतर्गत होणाऱ्या बैठका, समारंभ आणि इतर कार्यक्रमाच्या वेळी देखील सन्माननीय व्यक्तींचे स्वागत अशाच पध्दतीने करण्यात यावे.

उपरोक्त सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७१७११३१३२१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2015.07.17 11:34:01 +05'30'

**(डी.एल. थोरात)**
**सहसचिव (वने)**

**प्रत**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. खाजगी सचिव, मा. मंत्री (वने), मंत्रालय, मुंबई
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, वनभवन नागपूर
१२. सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
१४. मुख्य वनसंरक्षक तथा उपमहासंचालक, सामाजिक वनीकरण (सर्व)
१५. उपसंचालक, सामाजिक वनीकरण (सर्व)
१६. वनसंरक्षक (सर्व)
१७. उप वनसंरक्षक (सर्व)

त्यांना विनंती करण्यात येते की, वरील परिपत्रकातील सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

वन विभागातील सर्व सह सचिव, विशेष कार्यअधिकारी, सर्व कार्यासन अधिकारी.

ह्यांना माहितीसाठी आणि मंत्रालय स्तरावर अशाच रितीने कार्यवाही करण्याबाबत पुढाकार घेणेबाबत.